"प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांचा आर्थिक अभ्यास-विशेष संदर्भ नांदेड जिल्हा."

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वाणिज्य विद्याशाखाअंतर्गत (विद्यावाचस्पती)
पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधज

संतोष विठ्ठलराव गायकवाड

एम.कॉम.बी.एड.

मु.पो.लोहा, ता.लोहा, जि.नांदेड.

मार्जदर्शज

डॉ. व्ही.ए.पवळे,

सहयोजी प्राध्यापज , एम.कॉम.,एल.एल.बी.,पीएच.डी.

ए.सी.एस.कॉलेज,शंकरनगर.

संशोध-ा जें द्र

वाणिज्य व व्यवस्थापन संकुल,एस.आर.टी.एम.यु. नांदेड.

२०२१-२०२२

"प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांचा आर्थिक अभ्यास-विशेष संदर्भ नांदेड जिल्हा."

जोषवारा :(Abstract)

भारत हा विकसनशील देश आहे. भारताची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्याचा सर्वांगीण क्षेत्रातुन विकास होणे गरजेचे असते. भारताच्या अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्र व सेवाक्षेत्राचा विकास होणे गरजेचे असते.

PMMY योजनेद्वारे छोट्या उद्योगांना सहजरित्या कर्ज पुरवठा होऊन त्यातुन उद्योगांच्या वाढीमुळे नवनविन रोजगारांची निर्मिती होण्यास मदत होते. या रोजगार निर्मितीमुळे सामान्यांच्या आर्थिक स्थितीत हळूहळू सुधारणा होत असते. व त्यांच्या राहणीमानाचा दर्जाही सुधारला जातो. याचा सदरील संशोधनात अभ्यास करण्यात येणार आहे.

मुद्रा योजने अंतर्गत कर्ज देण्यासाठी आर.बी.आय. बँकेच्या अखत्यारीत सी.डी.बी. ही बँक उप कंपनी म्हणुन कार्य करते व कोणत्याही प्रकाराची संपत्ती तारण न ठेवता -नवि-न उद्योगांना रोजगार निर्मितीसाठी व जुन्या उद्योगांचा विस्तार करण्यासाठी कर्ज देते. यासाठी सदरील संशोधन कार्य सामान्यांना उद्योगासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य ज रज्यास हातभार लावतो.

हे संशोधन करण्यासाठी प्राथमिक, द्वितीयक संशोधन सामग्री वापरली जाणार आहे.

या प्रस्तुत संशोधन अध्ययन करण्यासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

१. प्रस्तावना (Introduction) :

भारत हा विकसनशील देश आहे. भारताच्या आर्थिक क्षेत्रात वाढ होण्यासाठी कृषी क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र व सेवा क्षेत्राचा विकास होणे गरजेचे असते. देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेचा विकास करावयाचा असेल तर उद्योग क्षेत्राच्या विकासाशिवाय गत्यंतर नाही. कारण उद्योग क्षेत्राचा विकास हा इतर क्षेत्राच्या तुलनेत जास्त व लवकर होत असतो. देशाच्या एकूणच अर्थकारणामध्ये अलिकडच्या काळात वाढलेले लघू उद्योगांचे योगदान नजरेआड करुन चालणार नाही. लघुउद्योगांची ही अफाट क्षमता लक्षता घेत प्रधा-नमंत्रींनी या सर्व लघु उद्योगांच्या सक्षमीकरणासाठी मुद्रा बँकेच्या माध्यमातून वित्तीय आधाराचा एक प्रकारचा बूस्ट देऊ केले आहे.

लघु व कूटिर उद्योगांच्या वित्त सहाय्यासाठी प्रधा-नमंत्री नरेद्र मोदी यांनी मुद्रा बँक योजना जाहीर केली. उद्योजकास अर्थसहाय्य म्हणजेच सहजगत्या कर्जपुरवठा PMMY योजनेमार्फत जे ला जातो. अशा कर्ज पुरवठ्यातून सामान्यांना उद्योग स्थापन करुन त्यातून रोजगार निर्मिती करण्याची संधी व प्रेरणा मिळते.

भारतातील तरुणांना प्रोत्साहीत करुन उद्योजक होण्याकडे प्रेरीत करण्यासाठी, ही योजना महत्त्वपूर्ण ठरते. या योजनेद्वारे देशाच्या आर्थिक स्थितीत वाढ होण्यास निश्चितच हातभार लागतो.

प्रधा-नमंत्री मुद्रा योजना (PMMY) ही माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ८ एप्रिल-२०१५ रोजी सुरु केलेली योजना आहे. बिगर, कॉर्पोरेट, बिगर शेती लघू जिं वा सूक्ष्म उद्योगांना रु.१० लाख चे कर्ज PMMY ह्या अंतर्गत 'मुद्रा' कर्ज म्हणून वर्गीकृत आहेत. ही कर्ज व्यावसायीक बँका, RRB, लघू वित्त बँक, MFI आणि NBFC द्वारे दिली जातात. कर्जदार वर नमुद केलेल्या कोणत्याही कर्ज देणाऱ्या संस्थांशी संपर्क साधू शकतो. किंवा www.udyamimitra.in या पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज करु शकतो. PMMY च्या आश्रयाने Mudra ने लाभार्थी सुक्ष्म युनिट जिं वा उद्योजकांच्या वाढीचा जिं वा विज ासाचा हप्ता

आणि निधीच्या गरजा दर्शविण्यासाठी 'शिशू' 'किशोर ' आणि तरुण ही तिन उत्पादने तयार केली आहेत.

मॉयक्रो युनिट्स डेव्हल्पमेंट अँड रिफायनान्स एजन्सी लि. (मुद्रा) ही एक एन.बी.एफ.सी. आहे जी देशातील सुक्ष्म उद्योग क्षेत्राच्या विकासाला मदत करते.

- शिशु - ५०००० पर्यंत चे कर्ज कव्हर करणे.
- किशोर - ५०००० ते रु.५ लाख पर्यंत चे कर्ज कव्हर करणे.
- तरुण- ५ लाख ते रु. १० लाखपर्यंत चे कर्ज कव्हर करणे.

नविन पिढीच्या इच्छूक, तरुणामध्ये उद्योजकतेला चालना देण्याच्या उद्देशाने, हे सूनिश्चित केले जाते की, शिशु श्रेणी युनिट आणि नंतर किशोर आणि तरुण श्रेणीवर अधिक लक्ष केंद्रीत केले जाईल.

शिशु, किशोर आणि तरुण अंतर्गत सुक्ष्म उद्योग क्षेत्राच्या विकास आणि वाढीच्या चौकटीत आणि एकूण उदिष्टात मुद्राद्वारे ऑफर केलेली उत्पादने विविधि क्षेत्रे किंवा व्यावसाय क्रियाकलाप तसेच उद्योजक विभागांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी अशा प्रकारे डिझाईन केलेले आहेत.

मुद्रा कर्जाचा उद्देश:

मुद्रा कर्ज विविध उद्देशासाठी विस्तारीत केले जाते. ज्यामूळे उत्पन्न आणि रोजगार, निर्मीती होते. कर्ज मुख्यत: यासाठी वाढविले जाते.

- विक्रते, व्यापारी, दुकानदार आणि इतर सेवा क्षेत्रातील क्रियाकलापासाठी व्यवसाय कर्ज.
- मुद्रा कार्डद्वारे कार्यरत भांडवल कर्ज.
- सुक्ष्म युनिटसाठी उपकरणे कर्ज.
- वाहतुक वाहन कर्ज- फक्त व्यावसायीक वापरासाठी.

- ृ षी-संलग्न बिगर शेती उत्पन्न देणाऱ्या उपक्रमांसाठी कर्ज, उदा. मत्स्यपालन, मधमाशी पालन, कुक्कुटपालन.
- ट्रॅक्टर, टिल्लर, तसेच दुचाकी कर्ज- फक्त व्यावसायीक कारणांसाठी वापरल्या जातात.

Mudra कर्जाअंतर्गत कव्हर करता येणाऱ्या क्रियाकलपांची उदाहरणात्मक यादी जालील प्रमाणे आहे.

- **वाहतुक वाहनः-**

ऑटो रिक्षा, लहान माल वाहतुक वाहने ३ चाकी, ई- रिक्षा टॅक्सी इत्यादी माल आणि प्रवाशांच्या वाहतुकीसाठी वाहतुक वाहनांची खरेदी फक्त व्यावसायीक कारणांसाठी वापरलेले ट्रॅक्टर/ ट्रॅली/ पॉवर टिल्लर देखील PMMY अंतर्गत मदतीसाठी पात्र आहेत. व्यावसायीक ज ारणासाठी वापरल्या जाणाऱ्या दूचाकी देखील PMMY अंतर्गत कव्हरेजसाठी पात्र आहेत.

- **समुदाय, सामाजिक आणि वैयक्तिक सेवा उपक्रम :-**

सलुन, ब्युटी पार्लर, व्यायामशाळा, बुटीक, टेलरिंगची दूकाने, ड्रायक्लीनिंग, सायकल आणि मोटरसायकल दुरुस्तीची दुकाने, डि.टी.पी. आणि फोटोकॉपी सुविधा, औषधंची दुकाने, कुरिअर एजंट इ.

- **अन्न उत्पादने क्षेत्र :-**

पापड बनविणे, आचार बनविणे, जाम ंिवा जेली बनवणे, ग्रामीण स्तरावर कृषी उत्पादनाचे जतन करणे मिठाईची दुकाने, लहान सेवा खाद्यपदार्थांचे स्टॉल आणि दैनंदिन ॅटरिंग ंिवा कॅन्टीनसेवा, कोल्ड चेन वाहने, कोल्ड स्टोरेज , बर्फ बनविण्याचे युनिट, आईस्क्रिम यासारखी उपक्रम युनिट बनविणे, बिस्किट, ब्रेड बनविणे इ.

- **ज ापड उत्पादन क्षेत्र :-**

हातमाग, यंत्रमाग, खादी क्रियाकलाप, जरी आणि जरदोरी वर्क, पारंपारिक भरतकाम आणि हातकाम पारंपारिक रंग आणि छपाई कपडे डिझाईन विणकाम, कॉटन जिनिंग,

संगणकीकृत भरतकाम, शिलाई आणि इतर कापड वि-नलेले वस्त्र, उत्पादने जसे कि पिशव्या, वाहन उपकरणे, फॅशिनिंज एक्सेसीरीज इत्यादी.

- **व्यापारी आजि दुकानदारांसाठी व्यवसाय कर्ज :-**

व्यक्तींना त्यांची दुकाने ज्िवा व्यापार आणि व्यावसायीक उपक्रम ज्िवा सेवा उपक्रम आणि लाभार्थी कर्जाच्या आकारमानासह बिगरशेती उत्पन्न देणारे उपक्रम चालविण्यासाठी आर्थिक सहाय्य म्हजू-न रु. १० लाख प्रती कर्जदारा-ना कर्ज दिले जाते.

- **सुक्ष्म युनिटसाठी उपकरणे वित्त योजना :-**

रु. १० लाख पर्यंतच्या प्रती लाभार्थी कर्जाच्या आज्ञारासह आवश्यक यंत्रसामग्री ज्िवा उपकरणे खरेदी करुन सुक्ष्म उपक्रमाची स्थापन करणे.

- **शेतीशी निगडीत उपक्रम :-**

शेतीशी संबंधीत उपक्रम उदा-मत्स्यपालन, मधमाशी पाल-न, कूक्कूटपालन, पशुपालन, प्रतवारी, वर्गीकरण, एकत्रीकरण कृषी उद्योज, डायरी, कृषी व्यवसाय केंद्रे, अन्न आणि कृषी प्रक्रिया इत्यादी (पिक कर्ज वगळून, जमीन सुधारणा जसे कि कालवे, सिंचन आणि विहिरी) आणि त्यांना आधार देणाऱ्या सेवा उत्पन्न वाढवतात ते सर्व PMMY अंतर्गत ज्व्हरेजसाठी पात्र असतात.

मुद्रा कार्ड :-

Mudra कार्ड हे कर्जाच्या खेळत्या भांडवलाच्या भागांसाठी मुद्रा कर्ज खात्यावर जारी केलेले डेबीट कार्ड आहे. कर्जदार मुद्रा कार्डाचा वापर एकाधिक ड्रॉ आणि ज्रेडीटसमध्ये ज्रु शकतो. जेणेकरुन खेळत्या भांडवलाची मर्यादा किफायतशीर पद्धतीने व्यवस्थापीत करता येईल आणि व्याजाचा बोजा कमीत कमी ठेवता येईल. मुद्राकार्ड, मुद्रा व्यवहारांचे डिजीटलायझेशन आणि कर्जदारांसाठी क्रेडीट इतिहास तयार करण्यात देखील मदत करते. मुद्रा ज्ार्ड कोण्यात्याही ATM ज्िवा मायक्रो एटीममधून पैसे काढण्यासाठी आणि कोणत्याही पॉईंट ऑफ सेल मशिनीद्वारे पैसे काढण्यासाठी देशभरात ऑपरेट केले जावु शकते.

मुद्रा योजनेची वैशिष्ट्ये :-

- देशातील ५.७७ कोटी उद्योजकांना वित्तसहाय्य.
- वार्षिक ७ टक्के दराने १० लाख रुपयापर्यंत अर्थपूरवठा.
- २०,००० कोटीचे सरकारचे भांडवली पाठबळ.
- सिडबी ची ही उपकंपनी रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येते.
- सुक्ष्म वित्त संस्थेव्यतीरिक्त बँकेकरीता स्वतंत्र विधायक.

मुद्रालोनसाठी आवश्यक बाबी :-

- ज ोणत्याही प्रकारचे मोर्गेज ठेवावे लागत नाही.
- स्वतःचे १० टक्के भाग भांडवलाची गरज नाही.
- ही योजना फक्त सरकारी बँकेतच मिळते.
- ही योजना वय वर्षे १८ पुर्ण असले तरच मिळते.
- अर्जदार कोणत्याही बँकेचा थकबाकीदार नसावा.

उद्योजज इतिहासः-

१६ व्या शतकाच्या प्रारंभी 'उद्योजक' हा शब्द लष्करी आरमारातील अग्रगण्य पुरुषां-ना सुचित करण्यासाठी फ्रेंच नागरिकांनी वापरला. इ.स. १७०० च्या सुमारास हा शब्द कंत्राटदार किंवा स्थापत्य विशारद यांच्यासाठी वापरला जात होता. १८ व्या शतकाच्या प्रारंभी हा शब्द फ्रेंच अर्थशास्त्रज्ञ रिचर्ड ज ॅटिलॉन, यांनी व्यवसाय आणि आर्थिक कृतीसाठी लागु केला.

१८४८ मध्ये प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ जॉन स्टुअर्ट मिल यांनी ' उद्योजकतेला ' खाजगी उद्योग स्थापक असे वर्णन केले.

- **उद्योजक संकल्पना :-**

विविध उद्योग, देश व वेळेनुसार उद्योजकतेची संकल्पना बदलत जाते. अर्थशास्त्रज्ञाकडे 'उद्योजक' किंवा उद्योजकता यांच्या सुसंगत व्याख्या कधीही नव्हत्या उद्योजक

हा शब्द Enterprende (एंटरप्रेंड) या फ्रेंच शब्दापासून आला आहे. याचा अर्थ 'To undertake' (हाती घेणे) असा होतो.

'उद्योजक' एक अशी व्यक्ती आहे की, जी व्यवसाय सुरु करते आणि पैसे ज मविण्यासाठी नुकसान सहन करण्यास तयार असते. 'व्यवसाय ' आणि जोखीम हे सामान्यपणे प्रचलित असलेले महत्त्वाचे शब्द एकमेकांशी संबंधीत असतात. जर वास्तवकित: व्यवसाय किंवा जोखीम नसेल तर व्यक्तीस उद्योजक म्हणून संबोधले जाऊ शकत नाही.

- एक छोटा व्यावसायिक त्याने आपल्या शेजारी किराजाचे दुकान सुरु केले आहे तो उद्योजक असतो.
- रस्त्याच्या बाजुला असलेले धूलाई केंद्रे सुविधा स्थापन करणारा उद्योजक असतो.
- ज ोट्यावधी रुपयांची उलाढाल असलेले रिलायन्स कंपनीचे संस्थापक ज्यांनी उच्च तंत्रज्ञानासह अनेक साधने दिली ते उद्योजक आहेत.
- स्वतंत्रपणे काम करणारा नळ कारागीर जो स्वत:साठी काम करतो आणि जलनिस्सारण बंद करतो तो उद्योजक असतो.

उद्योजकता म्हणजे एखादी व्यक्ती जोखीम घेऊन आणि तंत्रज्ञानाचा वापर करुन स्पर्धात्मक जागतिक वातावरण सक्षम करुन नविन व्यवसाय उद्योग सुरु करण्याची इच्छा होय.

ज मात अडथळा आणणारे तंत्रज्ञान किंवा उत्पादन असताना देखील सर्जनशीलता, नेतृत्व, शोधांचे आद्यप्रवर्तक हे उद्योजक असतात, ते आपल्या कामाप्रती उत्कट (कळकळ) असतात.

उद्योजकांना व्यवसायाचा आकार, कामाचा प्रकार, उद्योजकाचे वय किंवा औपचारीक शिक्षण इ. गोष्टी उद्योजक होण्यापासुन थांबवु शकत नाहीत. त्याचप्रमाणे यशअपयशाची देखील त्यांच्यावर काहीही परिणाम होत नाही. उद्योजक या अशा व्यक्ती असतात कि, ज्या

नविन कल्पना, उत्पादन, सेवा उपलब्ध करुन ते ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी चांगल्या बाजारपेठेची निर्मीती करतात.

- **उद्योजक-व्याज्या:-**

१. हॉवर्ड स्टिव्ह-सन यांच्या मते- "उद्योजकता म्हणजे नियंत्रित संसाधनाच्या पलीकडे संधी मिळविजे होय."

२. वेबस्टर शब्दकोशानुसार केलेली व्याख्या-

उद्योजक ही एक अशी व्यक्ती आहे जी पैसे मिळविण्यासाठी व्यवसाय सुरु करते आणि जोखीम पत्करण्यास तयार असते.

३. ऑक्सफर्ड इंग्रजी शब्दकोशानुसार-

उद्योजक म्हणजे अशी व्यक्ती जी व्यवसाय किंवा व्यवसाय संस्था संघटित करते आणि चालवते तसेच तो व्यवसाय करण्यासाठी आर्थिक जोखीम पत्करते.

नांदेड जिल्ह्याचा इतिहास -

जोदावरीच्या जोऱ्यात आग्नेय महाराष्ट्रात वसलेला नांदेड जिल्हा आहे. मराठवाडा भागात वसलेल्या या जिल्ह्याला ऐतिहासिक असे महत्व असून या ठिकाणी शिखांचे शेवटचे गुरु जोविंद सिंहजी महाराज यांचा गुरुद्वारा आहे.

आज नांदेड जिल्हा हुजूर साहेब या नावाने प्रख्यात झाला आहे. शीख धर्माचे गुरु श्री. जोविंदसिंहजी महाराज यांनी सन १७०५ मध्ये या ठिकाणी आपला देह ठेवला.

नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्यात दक्षिण पुर्वेला वसलेला जिल्हा असून याला लागुन आंध्र प्रदेश आणि कर्नाटक राज्यांच्या सिमा आहेत. महाराष्ट्र राज्यात दक्षिण टोकाला तेलंगणा राज्याच्या सिमेलगत नांदेड जिल्हा वसलेला आहे.

नांदेड या नावाचा उगम "नंदी-तट" या शब्दामधुन झालेला आहे. नंदी म्हणजे श्री शंकराचे वाहन आणि तट म्हजजे पवित्र गोदावरी नदीचा काठ.

नंदीने गोदावरी नदीच्या तिरावर तपस्या केली असल्याचा आख्यायिका आहे.

नांदेड हे सन १७२५ मध्ये हैद्राबाद संस्थानाचा हिस्सा झाले आणि १९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतरही निजाम संस्थानने आपले स्वतंत्र अस्तित्व राखल्याने नांदेड हैद्राबाद संस्थानाचाच हिस्सा बनून राहिले. पण भारत सरकारच्या पोलीस कारवाईनंतर १७ सप्टेंबर-१९४८ रोजी हैद्राबाद संस्थान स्वतंत्र भारत देशात समाविष्ट झाले व आत्ताचा नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्याचा भाग बनला.

अत्यंत संथ गतीपे वाटचाल करणारे मध्ययुगीन सल्तनीतले नांदेड आता झपाट्याने बदलू लागले आहे. नंदीतटाचे नांदेड आता लहान गावठाण राहिले नाही तर ते शहर बनले, पाहता पाहता शहराचा विस्तार घडत गेला आणि नांदेड महानगरपालिका अस्तित्वात आली.

या नांदेडमध्ये 'स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापिठ' स्थापन्न झाले. अनेक महाविद्यालय, मेडीकल, इंजिनिअरींग, लॉ, फॉर्मसी अशा विविध शाखांचे शिजज देजारी महाविद्यालय अस्तित्वात आली आहेत.

तसेच वेजवेजळे उद्योग, व्यवसाय संस्था, या नांदेड शहरामध्ये निर्माण झाले आहेत. वेजवेजळ्या कर्ज देणाऱ्या वित्तीय संस्था, बँका देखील या शहरामध्ये अस्तित्वात आहेत. याच बँज्े द्वारे प्रधान्नमंत्री मुद्रा योजना (PMMY) अंतर्गत बरेच उद्योग या नांदेड जिल्ह्यामध्ये सुरु झाले आहेत व यामुळे बऱ्याच लोकांचा स्वयंरोजगार सुरु करुन आपला उदरनिर्वाह भागत आहे.

२. संशोधन्न विषयाची निवड / समस्यासूत्रज :(Formulation of Research Topic)

"नांदेड जिल्ह्यातील नागरीकांना प्रधान्नमंत्री मुद्रा योजनेची ओळख करुन देणे, त्यातुन कर्ज घेऊन व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांची आर्थिक स्थिती, त्यांच्या समस्यांचा अभ्यास ज्रजे."

३. संशोधनाचे उद्दिष्ट्ये :(Objective of Research)

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत सुरु झालेल्या व्यवसायाचा आढावा घेणे.

२. नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांच्या आर्थिक स्थितीत होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.

३.नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत सुरु ज़े लेले व्यवसाय जिल्ह्याच्या आर्थिक विकासात मदतीचे ठरतात याचा अभ्यास करणे.

४. नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय ज़रजाऱ्या उद्योजकांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

५. नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांच्या समस्येवर धोरणात्मक उपाययोजने संबंधीचा अभ्यास करणे.

४. संशोधनाची परिकल्पना ज़िंवा गृहितके :(Hypothesis of Research)

प्रस्तुत संशोधनाच्या परिकल्पना ज़िंवा गृहितके खालीलप्रमाणे आहेत.

१. नांदेड जिल्ह्यामध्ये प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या व्यवसायामध्ये वाढ होत आहे.

२. नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांचे उत्पन्न वाढते.

३. नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांना स्वरोजगाराची संधी मिळत आहे.

५. संशोधनाचे महत्त्व :(Importance of Research)

प्रस्तुत प्रबंधात प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांचा आर्थिक अभ्यास केला जाणार आहे. म्हजून हे संशोधन कर्ज घेऊन नविन व्यवसाय सुरु करणाऱ्या व्यक्तींच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. आतापर्यंत नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा

योजने अंतर्गत व्यवसाय करणारा उद्योजकांचा आर्थिक अभ्यास या विषयावर प्रथमतःच सदरील संशोधनात प्रकाश टाकला जाणार आहे.

नांदेड जिल्ह्यातील नविन उद्योजकांना स्वयंरोजगार करताना येणाऱ्या समस्या, त्यांची आर्थिक स्थिती यासाठी या संशोधनाचे महत्व दिसून येते.

संशोधनाची व्याप्ती :(Scope of Research)

नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांचा आर्थिक अभ्यास करण्यात येणार आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील जनतेलाही ही माहिती परीपुर्ण उपयोगी पडेल या दृष्टीकोणातुन या अभ्यासाची व्याप्ती आहे.

६. संशोधन पद्धती :(Research Methodology)

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम सामग्रीच्या आधारे तथ्याचे संकलन करण्यात येणार आहे. या संशोधनाकरीता संख्यात्मक व गुणात्मक अशा दोन्ही प्रकारचा वापर करुन सामग्री गोळा करण्यात येणार आहे. या संशोधन विषयात वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे.

७. तथ्य संकलन:(Data Collection)

संशोधनाच्या दृष्टीने माहिती संकलीत ज रणे अत्यंत आवश्यक असते. सदरील संशोधनासाठी गोळा करण्यात येणारी माहिती प्राथमिक साधन सामग्री व दुय्यम साध-न सामग्रीच्या आधारे प्राप्त करता येते.

➢ **प्राथमिज तथ्य संकलन :(Primary Data Collection)**

या संशोधनाकरीता प्राथमिक तथ्य संकलनासाठी निरीक्षण, मुलाखत, प्रश्नावली ही साधने प्रामुख्याने वापरली जाणार आहेत. संशोधज नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांसाठी प्रश्नावली तयार करुन या प्रश्नावलीच्या सहाय्याने प्रत्यक्ष भेटी देऊन तसेच वित्तीय, इतर संस्थेला व बँकेला भेटी देऊन प्राथमिक माहिती उपलब्ध करण्यात येणार आहे.

➢ **दुय्यम तथ्य संकलन :(Secondary Data Collection)**

या विषयावर संशोधनाकरीता संदर्भ संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. त्यामध्ये विविध संकेतस्थळे, सरकारी व गैरसरकारी वार्षिक अहवाल, जिल्हा आर्थिज अहवाल, विविध संशोधन अहवाल, विविध पुस्तिका, प्रकाशनातील लेख यांचा वापर करण्यात येणार आहे.

८. तथ्य संकलनाचे विश्लेषण :(Data Analysis)

प्रस्तुत प्रबंधात प्राथमिक तसेच दुय्यम पद्धतीच्या सहाय्याने तथ्य संकलन केले जाणार आहे. व त्या तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी योग्य असेल त्या चाचणीचा अवलंब जेला जाणार आहे. त्याचबरोबर तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी, टक्केवारी, मध्यमान, सहसंबध गुणक, आलेख इत्यादी सांख्यकिय तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

९. नमुना निवड :(Sample Selection)

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने संशोधनासाठी नमुना निवड करण्यासाठी गैर-संभाव्यता नमुना निवड पद्धती वापरण्यात येजार आहे. सदरील संशोधनात हेतुपूर्वक नांदेड जिल्ह्यातील प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांची निवड करज्यात येणार आहे.

सहेतुक नमुना निवड पद्धती :

सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करुन नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यापैकी निवडक पद्धतीने ८ तालुके संशोधनासाठी निवडले जाणार आहेत. व त्या प्रत्येक तालुक्यातुन प्रधा-नमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या १०० उद्योजकांकडून प्रश्नावली भरुन घेतली जाणार आहे. असे मिळून ८ तालुक्यातून ८०० उद्योजकांची प्रश्नावली भरुन घेतली जाणार आहे.

लोहा, जंधार, मुखेड, अर्धापूर, नांदेड, किनवट, मुदखेड, देगलूर या तालुक्यावरआधारित संशोधन अभ्यास करण्यात येत आहे.

संशोधन कालावधी :(Period of Research)

योजना सुरु झालेल्या कालावधीपासून म्हणजेच ८ एप्रिल -२०१५ ते २०२१-२२ या कालावधीपर्यंत कालखंड निवडण्यात आला आहे.

१०. संशोधनाच्या मर्यादा: (Limitation of Research)

प्रस्तुत संशोधन हे फक्त नांदेड जिल्ह्यापूरतेच मर्यादीत आहे. तसेच हे संशोधन उद्योजकांच्या फक्त आर्थिक स्थिती पूरतेच मर्यादीत आहे, हे संशोधन सध्याच्या स्थितीवर आधारीत आहे.

प्रस्तुत संशोधनामध्ये नांदेड जिल्ह्यातील प्रधानमंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांवर अधिक लक्ष केंद्रित केले जाणार आहे. सदरील संशोधनात कर्ज घेणारे उद्योजक यांच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण केले जाणार आहे.

संशोधनात प्राथमिक साम्रगीचा वापर करण्यात आल्यामूळे उत्तरदात्यांकडून प्रश्नावली व मुलाखत भरुन घेताना माहिती पूर्वग्रहदूषीत असण्याची मर्यादा पडते.

११. प्रकरण योजना :

प्रकरण पहिले - प्रस्तावना :

या प्रकरणामध्ये मुद्रा योजनेचे स्थापना, अर्थ, योजनेची वैशिष्ट्ये , प्रकार, मुद्रा कार्ड ही संकल्पना, उद्योजक, अर्थ, व्याख्या, संकल्पना, इतिहास तसेच नांदेड जिल्ह्याची ओळख या प्रकरणात स्पष्ट केली आहे.

तसेच अध्ययन विषयाची निवड, महत्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, संशोधन पद्धती, तथ्य संकलन, व तथ्य विश्लेषणाची साधने, संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा, संशोधन कालावधी या सर्व घटकांचे विश्लेषण केले जाईल.

प्रज रज दुसरे - संशोधन साहित्याचा आढावा :

प्रस्तुत प्रकरणात, संशोधन साहित्याचा आढावा "प्रधा-ामंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांचा आर्थिक अभ्यास-विशेष संदर्भ नांदेड जिल्हा." त्या अनुषंगाने घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - प्रधा-ामंत्री मुद्रा योजने अंतर्गत कर्ज घेऊन व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांच्या आर्थिक स्थितीत होणाऱ्या बदलांचा अभ्यास :

या प्रज रजामध्ये नांदेड जिल्ह्यातील प्रधा-ामंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांच्या आर्थिक स्थितीत होणाऱ्या बदलांचा अभ्यास करण्यात येणार आहे. नांदेड जिल्ह्यातील निवडक उद्योजकांची आर्थिक माहिती संकलीत करण्यात येणार आहे. व संकलीत ज्ेलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रज रज चौथे - प्रधा-ामंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांच्या समस्येचा अभ्यास :

या प्रकरणामध्ये नांदेड जिल्ह्यातील प्रधा-ामंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांचा व त्यांच्या समस्यांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रज रज पाचवे - ानिष्ज र्ष, संशोधन अनुमान व उपाययोजना :

या प्रज रजामध्ये प्रधा-ामंत्री मुद्रा योजने अंतर्गत व्यवसाय सुरु केलेल्या उद्योजकाकडून तथ्य संकलनातुन मिळालेल्या माहितीच्या आधारे निष्कर्षाची मांडणी, गृहीतकृत्यांची पडताळणी व संशोधनातून काही धोरणात्मक उपाय योजना सुचविण्यात आल्या आहेत.

वर्षनिहाय नियोजनाची रुपरेषा :

प्रस्तुत संशोधन विषयाची मांडणी व अध्ययना बरोबर प्रबंध लेखनाचे कार्य यासाठी विषयनिहाय नियोजीत आराखडा खालीलप्रमाणे राहील.

प्रथम वर्ष :

प्रथम वर्षात संशोधनाच्या विषयानुषंगाने अध्ययन सामग्रीचे संकलन, उद्दिष्ट्ये मर्यादा ह्याप्रमाणे प्रथम प्रकरणाची रुपरेषा व मांडणी करणे, संशोधन साहित्याचा आढावा घेणे. व जोळा केलेल्या तथ्याचे अध्ययन करुन विश्लेषण करणे. इत्यादी कार्य करण्यात येणार आहेत.

द्वितीय वर्षः

संज्लीत करण्यात आलेल्या तथ्याच्या विश्लेषणातुन गृहीतकृत्याची पडताळणी याद्वारे निष्कर्ष प्रस्तुत करणे. अध्ययन विषयासंदर्भात विविध शिफारशी मांडण्यात येणार आहे. व संपुर्ण प्रकरणाच्या समावेशाचा प्रबंध अहवाल विद्यापीठात सादर करण्यात येणार आहे.

१२. संदर्भ सूची :

१. संशोध-न पद्धती वि.भा.पाटील.
२.प्रा. बोधनकार सुधीर अलोनी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक ललीता पुराणीक, श्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, द्वितीय आवृत्ती १९९९
३. आगलावे प्रदिप २००० संशोधक पद्धती शास्त्र व तंत्रे विद्या प्रकाशन, नाजपूर.
४. जैर-ार दिलीप, २००४, सामाजिक संशोधन पद्धती चिन्मय प्रकाशन औरंगाबाद.
५. गाल्टुंग जॉहेन, थिअरी अँण्ड मेथडस ऑफ सोशल रिसर्च जॉन ॲलन अॅण्ड आन्विद लि न्युऑर्क.
६. नाडगोंडे गुरुनाथ, सामाजिक संशोधन पद्धती, पडके, प्रकाशन कोल्हापूर,२००१.
७. काचोळे दा.धों. सामाजिक संशोधन पद्धती कैलास प्रकाशन, औरंगाबाद-१९९.
८. देव प्रभाकर, नांदेड जिल्ह्याचा इतिहास.
९. भांडाकर पु.ल. सामाजिक संशोधक पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७.
१०. www.mudra.org.in
११. web.umang.gov.in
१२. pmmodiyojna.in
१३. www. wikipedia.org
१४.mr.vikaspedia.in
१५. www.sbi.in
१६. www. mudraloan.com
१७. www. mudramitra.in
१८. www.mahamudramaharashtra.gov.in.
१९. www.cgdif.nic.in
२०. www.yojanapdeida.com

संशोधज

संतोष विठ्ठलराव गायकवाड
एम.कॉम.बी.एड्.
मु.पो.लोहा, ता. लोहा,जि.नांदेड.

मार्जदर्शज

डॉ. व्ही.ए.पवळे,
सहयोजी प्राध्यापज ,
एम.कॉम.,एल.एल.बी.,पीएच.डी.
ए.सी.एस.कॉलेज,शंकरनगर.